२२. श्री. सुरेश बाबू चिकणकर, वय ४१ वर्षे

२३. श्रीमती. देवकीबाई भ्र. बाळाराम

२४. श्रीमती. द्रौपदीबाई भ्र. गणपत

२५. श्रीमती. कमलाबाई गंगाराम चिकणकर

सर्वांचा धंदा शेती, सर्व रा. मौजे द्वारली, तालुका उल्हासनगर, जिल्हा ठाणे.

उहन - ३
दसत क्र. ९५८/ १९९९
५८ / ११८

येणे प्रमाणे कुलमुखत्यारपत्र करुन देतो की,

अ) तुकडा व जिल्हा ठाणे, पोट तुकडा व तालुका उल्हासनगर, मौजे द्वारली, कल्याण महानगरपालिका हद्दीतील आमचे वडिलोपर्जित मालकी वहिवाटीची व ताबे कब्जातील खालील वर्णनाची मिळकत आहे.

मौजे द्वारली, तालुका उल्हासनगर येथील मिळकत

| स.न. | हि.न. | क्षेत्र हे.आर.प्र. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३५ | ३ | ०-७३-०३ | १-०६ |
| ३५ | १० | ०-१०-०९ | ०-१७ |
| ३५ | १२ | ०-०२-०० | ०-१७ |
| ३६ | ७ पैकी | १-५०-०० | ३-५६ |
| | एकुण | २-३५-१२ | |

म्हणजेच सुमारे २८,५८० चौ. वार.

सदरचे मिळकतीचे वर्णन सोबतचे परिशिष्टात विस्ताराने दिले आहे. जीस यापुढे सदरची मिळकत म्हणुन संबोधू.

V. G. Chikankar

उहन - ३
दस्त क्र. ९५८/२०११
६०/११६



ब) दि.३१.५.१९९६ चे विकास व विक्री प्राधिकरण करार जो मे. अंजनेया लँड ऍंड प्रॉपर्टी डेव्हलपर्स हे डेव्हलपर्स म्हणून आम्ही ओणर्स म्हणून आणि मे. नरेश डेव्हलपमेंटस अँड इन्व्हेस्टमेंटस हे कन्फर्मींग पार्टी म्हणून यांचेत झाला, त्याद्वारे आम्ही कन्फर्मींग पार्टीचे संगमत्तीने सदरची मिळकत सदर मे. अंजनेया लँड ऍंड प्रॉपर्टी डेव्हलपर्स यांस विकास व विक्रीसाठी त्यातील अटी शर्तीवर देण्याचे मान्य केले आहे.

सदर मिळकतीचा विकास व विक्री करणे त्यांना शक्य व्हावे म्हणून आम्ही त्यांस किंवा त्यांचे नॉमिनीज ना कुलमुखत्यारपत्र देण्याचे मान्य केलेले आहे.

सबब आम्ही या लेखाद्वारे सदर मे. अंजनेया लँड ऍंड प्रॉपर्टी डेव्हलपर्सचे भागीदार **१) श्री गणपतराव बदनराज मेहता , २) श्री प्रमोद कैलाशचंद्र देवरा आणि ३) श्री नीलकंठ पोपट घनवट** ह्यांस आमचे कुलमुखत्यारी म्हणून पसंत करून नेमीत आहोत व त्यांनीही आमचे कुलमुखत्यारी म्हणून काम करण्यास मान्यता दिली आहे व त्यांनी सदर प्रॉपर्टी संबंधाने करावयाची कामे ही एकत्रीतपणे ( जॉईंटली ) वा एकेकट्याने ( सेव्हरली ) अशी करावयाची आहेत. सबब सदर मिळकतीचे विकास व विकी संबंधाने त्यांनी करावयाची कामे पूढील प्रमाणे :

१) सदर मिळकतीचा ताबा/कब्जा घेऊन तिचा संभाळ करणे.

२) आमचे अखत्यांरांना योग्य वाटल्यास सदर मिळकतीच्या डेव्हलपर्सबरोबर ठरलेल्या विक्री व्यवहार त्यांचे किंवा त्यांचे नॉमिनीजचे नावे सदर मिळकतीचे कायम फरोक्तखत करून्न पूर्ण करणे. सदर खरेदीखतावर आमचे वतीने व्हेन्डोर्स म्हणून सह्या करणे व ते एक्झीक्यूट करणे. असे एक्झीक्यूट झालेले खरेदीखत मे. दुय्यम निबंधक साहेब उल्हासनगर यांजकडे आमचे वतीने दाखल करणे व त्यांचे समोर ते एक्झीक्यूट करणे व नोंदणी पूर्ण होण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या त्या गोष्टी करणे.

V. G. Chikankar

३) सदरचे खरेदीखत करताना आधी ज्या ज्या काही गोष्टी, वा परवानग्या घेणे आवश्यक ठरतात त्या त्या गोष्टी आमच्या वतीने घेणे वा परवानग्या मिळविणे. त्यास्तव आवश्यक तेथे विनंती अर्ज करणे, कागदपत्रे सादर करणे, सत्यप्रतिज्ञालेख, जाहिरनामे, हमीपत्रे, जाबजबाब देणे, इत्यादी आवश्यक त्या गोष्टी करणे.

उहन - 3
दस्त क्र २५८/
८९/१९९८

४) सदरची मिळकत ही उल्हासनगर नागरी संकुलात मोडत असल्यामुळे कमाल नागरी कायदा १९७६ चे कलम ६( ) खालील आवश्यक ते आमचे धारण क्षेत्रा बद्दलचे विवरणपत्र संबंधीत सक्षम प्राधीकरणाकडे दाखल करणे व त्यामध्ये सदरची मिळकत ही रीटेनेबल म्हणुन दर्शविणे.

५) सदरचे विवरणपत्रावर कलम ८(३) खालील ड्राफ्ट स्टेटमेंट आले नंतर त्याचा अभ्यास करुन आवश्यक वाटल्यास त्यात हरकत घेणे व सदर व सदर प्रोसिडींगमध्ये आमची बाजू मांडून कलम ८(४) खालील डिक्लरेशन (आदेश) मिळविणे.

६) सदर कलम ८(४) खालील आदेश योग्य न वाटल्यास त्याविरुध्द सक्षम प्राधिकारीणी न्यायालयामध्ये अपिल/रिव्हीजन दाखल करणे व ते चालविणे. त्यास्तव आवश्यक त्या सर्व गोष्टी करणे.

७) सदरचे मिळकतीचा योग्य विकास करण्यासाठी संबंधीत सक्षम यु.एल.सी. ऑथॉरीटीकडून आवश्यक ती विकास परवानगी वा ना हरकत दाखला मिळविणे किंवा सदर कायद्याचे कलम २०,२१, वा २२ खालील स्कीम मंजूर करवून घेवून सदर मिळकतीचा विकास करणे. त्यास्तव विनंती अर्ज करणे, आवश्यक ते कागदपत्रे सादर करणे, सदर कामी ॲफिडेव्हीट, हमीपत्र, जाहीरणामे देणे, जाबजबाब देणे व सदर आवश्यक ते आदेश मिळविणे वा स्कीम मंजूर करवूण घेणे वा सदर मिळकत डेव्हलपर्सचे नावें ट्रांसफर करण्यासाठी कलम २६/२७ खालील आवश्यक ती परवानगी मिळविणे.

V. G. Chikonkar

उ.ह. - ३
दस्त क्र. २५८/ २०११
१२/ ११८



८) सदरची मिळकत ही सध्या शेतीचे वापरात आहे तेव्हा ती विकसीत करण्याच्या दृष्टीने रहीवासासाठी बिनशेती करवुन घेण्यासाठी जिल्हाधिकारी ठाणे, प्रांत अधिकारी ठाणे वा तहसिलदार उल्हासनगर यांजकडे आवश्यक ते बिनशेती प्रपोजल/ले-आऊट सादर करुन त्या कामी आवश्यक ती कागदपत्रे दखल करणे, अॅफीडेव्हीट, जाबजबाब, हमीपत्रे, जाहीरणामे देणे व मिळकत बिनशेती करवून घेणे. सदर आदेशनुसार भरावा लागणारा कन्व्हरशन टॅक्स भरणे.

९) डी.आय.एल.आर. ठाणे वा टी.आय.एल.आर. उल्हासनगर / कल्याण यांजकडून सदर मिळकतीचा सर्व्हे वा मोजणी करवून घेणे. त्यास्तव आवश्यक तो विनंती अर्ज सादर करणे. सर्व्हे फी भरणे व मोजणीचा नकाशा मिळविणे.

१०) सदर मिळकतीचे तारणवार कर्ज मिळविणे. त्यास्तव आवश्यक त्या बँकेकडे वा फायनान्स इन्स्टीट्यूटकडे लोन प्रपोजल सादर करून आवश्यक ती कागदपत्रे दाखल करणे, आवश्यक ते डॉक्यूमेंट्स एक्झीक्यूट करणे, मॉरगेज डीड (गहाणपत्रे) करून ते दुय्यम निबंधक साहेब उल्हासनगर यांचेकडे सादर करणे व नोंदवून घेणे. थोडक्यात लोन प्रपोजल मंजूर होणेसाठी सर्व संबंधीत वा आवश्यक त्या गोष्टी करणे.

११) सदरची मिळकतीचा काही भाग अतिक्रमणीत असेल वा कोणी वहिवाट दाखवीत असेल, किंवा कुणी कब्जा/ताबा क्लेम करीत असेल तर अशा व्यक्ती संस्थेविरुध्द आवश्यक ती दिवाणी/फौजदारी कारवाई करूण ते अतिक्रमण काढून घेणे वा ताबा/कब्जा वा वहिवाट सोडवून घेणे. या संदंभात आमचे अखत्यारांस योग्य वाटल्यास अशा व्यक्ती/संस्थेबरोबर समझौता घडवून आणणे व समझौत्यानुसार आवश्यक ते कॉम्पेन्सेशन/सेटलमेंट रक्कम देणे व त्यांचे समवेत आवश्यक ती कागदपत्रे, डीड्स करणे ती दुय्यम निबंधक साहेब

V. G. Chikonkar